खासदार/आमदार यांना शासकीय कार्यालयात सौजन्यपूर्ण वागणूक देण्यासंबंधी

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
क्रमांक सीडीआर-१०९१/प्र.क्र. ६/९१/अकरा,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:-३१ डिसेंबर १९९१.

पहावे:- १] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीडीआर-१०६४/डी, दिनांक २२.४.६४

२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीएमडी-१९७३/एलसी, दिनांक २५.५.७३

३] शासन परिपत्रक, विधान कार्य विभाग, क्रमांक एलईओ-१०७८/११३४/३, दिनांक १२.१०.७८

४] शासन ज्ञापन सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एमपीजी-१०८०/६१/१८, दिनांक २८.३.८०.

५] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एमपीजी-१०८२/२५/१८/[र.व का.] दिनांक २०.११.८२

६] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीडीआर-१०८८/८३५/१२/अकरा, दिनांक १८.८.८८

## प रि प त्र क.

संसद सदस्य/ विधानमंडळ सदस्य यांच्याशी शासकीय अधिकाऱ्यांनी/कर्मचाऱ्यांनी आदराची व सौजन्यपूर्ण वागणूक ठेवण्याबाबतच्या सूचना संदर्भाधीन परिपत्रकाव्दारे वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. शासकीय यंत्रणा व खासदार, आमदार व इतर मान्यवर लोक प्रतिनिधींमध्ये सुसंवाद राखला जावा या दृष्टीने उपयुक्त सूचना पुन: एकदा सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात येत आहेत.

२ या सूचनांचा एक संच सोबत जोडला आहे. या सूचनांचे पालन करण्याची सर्व शासकीय अधिकाऱ्यांनी/कर्मचाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

३. मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त मार्गदर्शक सूचना त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय कार्यालये व निमशासकीय, शासन नियंत्रित व तत्सम संस्थांच्या निदर्शनास आणून त्यांचेकडून या सूचनांचे पालन होईलयाची दक्षता घ्यावी. तसेच या आदेशांचा भंग एखाद्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केल्यास त्यांचे विरुध्द कडक कारवाई करण्यात येईल. हे त्यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
[क. पं...]

खासदार/आमदार यांना शासकीय कार्यालयात सौजन्यपूर्ण वागणूक देण्यासंबंधी ) सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. सीडीआर १०९१/ प्र. क्र. ६/९१/अकरा दिनांक ११ डिसेंबर १९९१ चे परिपत्रकाची प्रत व त्या सोबत जोडलेल्या सूचनांच्या संचाची प्रत)

—x—

क्रमांक एस–११/४८७/प्र. क्र. १४/म–५

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई–४०००३२
दिनांक:–२१.१.१९९२

कक्ष अधिकारी ई/ई–१/ई–६/ई–७/ई–१०/फ–४/फ–१/फ–७/फ–८/म–१
ल–६/ल–७, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई–४०००३२

सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी,
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
नोंदणी महानिरिक्षक, व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रबंधक महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई
मुद्रांक अधिक्षक, मुंबई

यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त परिपत्रकांतील मार्गदर्शक सूचना अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून त्यांचेकडून त्या सूचनांचे पालन होईल अशी दक्षता घ्यावी तसेच या आदेशांचा भंग एखादा शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केल्यास त्यांचे विरुध्द कडक करण्यात येईल असेही त्यांच्या निदर्शनास आणावे.

[signature] २१/१/९२

कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग.

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
3 - FEB 1992
शाखा–
म. लि. कि. उ. जि. जिल्हाधिकारी

३ ससा(२)

४/९२

१००

क्र. ससा(२)-अनौनि- १००/९२
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
रत्नागिरी दि. ११.२.९२

AC 13/2

अनौपचारीक संदर्भाने महसूल शाखेकडे पुढील जरुर त्या कार्यवाही साठी रवाना)